# पुणे महानगरपालिका

## मालमत्ता व व्यवस्थापन विभाग

६ महिने करारपद्धतीने सेवा घेणेबाबत

पुणे महानगरपालिका प्रशासानाकडील मालमत्ता व व्यवस्थापन विभागातील मेंटेनन्स सर्व्हेअर च्या ५ पदांसाठी ६ महिने मुदतीकरिता शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त मेंटेनन्स सर्व्हेअर यांचेकडून सेवा उपलब्ध करून घेणेकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत

एकवट मानधनावर सेवा घ्यावयाच्या मेंटेनन्स सर्व्हेअरच्या ५ पदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | अजा | अज | विजा अ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एसई बीसी | इडब्लू एस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मेंटेनन्स सर्व्हेअर | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ५ |

सदर पदासाठीची आवश्यक शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे :-

" एस.एस.सी.उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सर्व्हेक्षक व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण."तसेच शासकीय/निमशासकीय सेवेतील मेंटेनन्स सर्व्हेअर कामाचा अनुभव असणे अनिवार्य राहील.

पात्र उमेदवारांची उपरोक्त शैक्षणिक अर्हता व शासकीय/निमशासकीय कामाचा अनुभव यांची गुणांकन पडताळणी (objective assessment ) करून ६ महिने मुदतीसाठी प्रतिमहा रु.३००००/- एकवट मानधनावर निवड करण्यात येईल.

अटी :-

१.सदर पदाची नेमणूक हि फक्त ६ महिन्याकरिता असेल.
२.वरील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व शासकीय/निमशासकीय सेवेतील मेंटेनन्स सर्व्हेअर पदाचे कामाचा अनुभव अनिवार्य राहील.
३.अर्जासोबत एक पारपत्र आकाराचे छायाचित्र,जन्मदाखला,शैक्षणिक प्रमाणपत्रे,शासकीय/निमशासकीय सेवेतील कामाचा अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.
४.निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.
५.वरील पदे अस्थायी स्वरुपाची असून ६ महिने मुदतीवर मानधन तत्वाने असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना मनपाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क सांगता येणार नाही.
६.वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा.उप आयुक्त मालमत्ता व्यवस्थापन यांना राहतील.
७.निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एक महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल.त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. तसेच रु.१००/- चे मुद्रांकावर करारनामा करून द्यावा लागेल व यासाठी खर्च उमेदवारास स्वतः करावा लागेल.
८.अर्धवट भरलेला/अपुरी कागदपत्रे असणारा तसेच नमूद दिनांकानंतर प्राप्त होणारा अर्ज सदर प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही,

तरी इच्छुक शासकीय/निमशासकीय सेवेतील सेवानिवृत्त मेंटेनन्स सर्व्हेअर यांनी कार्यालय खोली क्र.२४३,दुसरा मजला,मालमत्ता व्यवस्थापन विभाग,पुणे महानगरपालिका,शिवाजीनगर,पुणे – ४११ ००५ या ठिकाणी जाहिरात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून पुढील ८ दिवसांत (वर नमूद केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह लेखी/टंकलिखित अर्ज कार्यालयीन वेळेत सादर करावा. पात्र उमेदवारांची उपरोक्त शैक्षणिक अर्हता व शासकीय/निमशासकीय कामाचा अनुभव यांची गुणांकन पडताळणी (objective assessment ) करून निवड करण्यात येईल.

स्वाक्षरी /-
(राजेंद्र मुठे)
उप आयुक्त
मालमत्ता व व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका